Vol 5 Issue 7 April 2016 ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 7 | April - 2016

Review Of Research

# शेती व ग्रामीण विकासाची व्यूहरचना

संभाजी भाऊराव काळे[1] , बाळासाहेब जयराम जाधव[2]
[1]उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख , जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, ज्ञानेश्वर नगर, भेंडा, जि. अहमदनगर .
[2]संशोधन केंद्र, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग , स.म.भा.स. थोरात महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर.

### प्रस्तावना:–

भारतातील ग्रामीण विकासाच्या शासकीय योजना आणि अशासकिय संघटनांचे प्रयत्न यांचे यश कमी लेखण्यासारखे नसले तरी वस्तुस्थिती ही आहे की देशातील दारिद्रयरेषेखालच्या लोकांपैकी तीन–चतुर्थांश लोक ग्रामीण भागातील आहेत. राहणीमानाची वाढ दर्शविणारे इतर घटक बाजुला ठेवले, तरी या लोकांच्या किमान गरजांही पूर्ण होणे सध्या दृष्टीपथात नाहीत. प्राथमिक शिक्षण व आरोग्य, निवारा शुध्द पेय जल, स्वच्छता, पायाभूत सुविधां यांची पूर्तता सर्वसामान्य पध्दतीने होण्याची शक्यता नसल्यामुळे ग्रामीण विकासाच्या विशिष्ट व्यूहरचनेची नितांत आवश्यकता आहे. या उपाययोजनांचा उल्लेख पुढीलप्रमाणे –

### आवश्यक सुविधा

### निवारा :

ग्रामीण भागात बेघर कुंटुंबाची संख्या अद्यापही लक्षणीय आहे. ज्या कुंटुंबांची घरे आहेत ती जुन्या पध्दतीची व मोडकळीस आलेली आहे. ग्रामीण निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सध्या इंदिरा आवास योजना आणि स्वुर्णजयंती ग्रामनिवारा योजना लागू आहेत. गृहनिर्माण व नागरी विकास महामंडळ तसेच सामान्य विमा महामंडळ यांच्या मार्फतही काही निधी उपलब्ध करुन दिला जातो.



निवासाच्या प्रश्नांचे व्यापक स्वरुप लक्षात घेता, हे प्रयत्न पुरेसे नाहीत. जर दरवर्षी २५ लाख घरे उपलब्ध करुन देण्याचे लक्ष ठेवले तर निवाऱ्याचा अनुशेष भरुन निघण्याची शक्यता राहील. त्याचबरोबर कर्जावरील व्याजाचा दर कमी करणे, निधीमध्ये वाढ करणे, भूखंड स्वामित्वाच्या तरतुदी सुलभ करणे, निधींच्या वापरांवर लक्ष ठेवणे यासारखी उपाय करण्याची गरज आहे.

### शिक्षण :

सर्वांसाठी शिक्षण, मुलीचे शिक्षण, प्रौढ शिक्षण अशा सर्व बाबींत आपण काही उदिद्ष्टये समोर ठेवली होती. विशाल लोकसंख्या आणि बरीच निरक्षरता असलेल्या या देशात साक्षरता वाढीचा प्रश्न इतका मोठा आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेला खर्च इतका अवाढव्य आहे की, निर्धारीत उदिद्ष्टये पूर्ण होणे कठीण आहे. म्हणूणच आता रुढ औपचारिक शिक्षणाला अनौपचारिक शिक्षणाची जोड दिली जात आहे. नियमित शिक्षकांच्या ऐवजी शिक्षण सेवकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे खर्च जरी कमी होत असला तरी गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होतो. यादृष्टीने शिक्षण सेवकांना नियुक्ती पूर्वी विशेष प्रशिक्षण देणे शिक्षकांच्या नियमित उपस्थितीकडे लक्ष देण्यासाठी प्रशासकिय यंत्रणेला ग्राम समित्यांची जोड देणे यासारखे उपाय केले जाऊ शकतात.

### आरोग्य :

व्यापक अर्थाने आरोग्य सेवकांमध्ये वैद्यकीय उपचार स्वच्छता, स्वच्छ पेय जल, आरोग्याबदद्ल जागरुकता इत्यादींचा समावेश होतो. त्यासाठी आपण जिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रे तसेच ग्राम आरोग्य मार्गदर्शक अशी व्यवस्था

केली आहे. ही व्यवस्था अपुरी तर आहेच शिवाय असमाधानकारकही आहे. कित्येक खेडयांच्या ५ ते २० किलोमीटर परिसरात अद्याप आरोग्य उपकेंद्रे सुध्दा नाहीत.

जेथे अशी केंद्रे आहेत तेथे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही, विविध उपकरणे नाहीत आणि आवश्यक औषधेही वेळेवर उपलब्ध नसते. खेडयामध्ये राहून काम करण्याची मानसिकता डॉक्टरामध्ये दिसून येत नाही व ती निर्माण व्हावी असे वातावरणही आढळत नाही. वैद्यकिय सेवेतील सुधारणासाठी कर्मचारी वर्ग व प्रशाकीय अधिकारी यांनी संवेदनशील असणे आवश्यक आहे. गावामध्ये आरोग्याबदद्ल जागरुकता निर्माण करणारे ग्राम आरोग्य मार्गदर्शक स्वतः पुरेसे प्रशिक्षित असावयास हवेत. त्यामुळे पुढील बराचसा खर्च व त्रास कमी होऊ शकतो.

### पोषण :

नागरीकांना केवळ अन्नाचा नव्हे तर पोषणमूल्य असलेल्या आहाराचा पुरवठा व्हावा या दृष्टीने 'राष्ट्रीय अन्न हमी योजना' साकार होत आहे. ग्रामीण भागावर विशेष भर असलेल्या या योजनेसाठी नियोजन आयोगाने १५० खेडयांची निवड केली आहे. 'क्षुधा मुक्ती' हे उदिदृष्ट साध्य करण्यासाठी सात कलमी कृती–आराखडा तयार झाला असून त्यामध्ये 'पोषण साक्षरतेंच्या प्रसाराची अभिनव कल्पना मांडलेली आहे. गर्भवती माता, वृध्द आणि दुर्बल व्यक्ती, विविध रोगांनी पिडित रुग्ण, कौमार्यवस्थेतील मुली व बालकांना त्यांच्या स्थितीनुसार पोषक आहार मिळावा यावर प्रस्तुत योजनेचा कटाक्ष आहे. सध्या शालेय बालकांना माध्यान्ह भोजन दिले जाते. एकूण हा कार्यक्रम स्तुत्य असून त्याची अंमजबजावणी कशी होते यावर त्याचे यश अवलंबून राहील.

### स्वच्छ पेयजल :

अनेक खेडयांमध्ये किंवा त्यांच्या आसपास पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नाही. ही मूलभूत गरज पूर्ण करण्यासाठी ग्रामीणांना बरीच पायपीट करावी लागते, जे पाणी उपलब्ध असेल ते वापरणे भाग असल्याने कॉलरा, गॅस्ट्रो, यासारख्या साथींच्या रोगांना आमंत्रण मिळते. ठिकठिकाणी नलिका कूपांची सोय करण्याचा प्रयत्न होत असला तरी त्यापैकी बरेच कूप नादुरुस्त स्थितीत आढळतात. ग्रामीण क्षेत्रात स्वच्छ पेयजलाची सोय करण्याच्या संदर्भात काही प्रमाणक निश्चित झाले आहेत. त्यानुसार अडीचशे व्यक्तीमागे एक हातपंप, साधारण दीड किलोमीटर परिसरात पिण्यासाठी योग्य पाण्याचा स्त्रोत, प्रतिव्यक्ती दैनंदिन ४० लिटर पाण्याची उपलब्धता (गुरांसाठी अतिरिक्त) इत्यादीसाठी प्रयत्न होत आहेत. पेयजलाच्या समस्येचे स्वरुप नीट लक्षात येण्यासाठी सरकारने राष्ट्रीय पातळीवर पाहणीही सुरु केली आहे.

### स्वच्छता :

ग्रामीण भागातील अनेक रोगांचे मूळ अस्वच्छतेमध्ये दिसून येते. बहुतेकांची घरे आतून सारवलेली दिसत असली तरी बाहय किंवा परिसर स्वच्छता हा एक दुर्लक्षित विषय आहे. घरातील कचरा रस्त्यावर टाकणे, घराबाहेर सांडपाणी सोडूण देणे, गुरांचे गोठे स्वच्छ नसणे इत्यादीमुळे रोगांच्या प्रसाराला हातभार लागतो. ग्रामीण भागातील केवळ सहा प्रतिशत कुंटुंबाकडे शौचालयाची व्यवस्था आढळते. सुलभ शौचालयांची व्यवस्था करुन घेण्यास शासकीय प्रोत्साहन असले तरी त्यासाठी व्यक्तीला करावा लागणारा आंशिक खर्च (पाचशे रुपये) करण्याची क्षमता किंवा मानसिकता ग्रामीण भागात नसल्याने या योजनेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अशा योजनेवरील अर्थसहाय्य वाढविणे हा तात्कालिक उपाय आहे. खरा प्रश्न मानसिकतेचा व सवयींचा आहे. लोकांना स्वच्छतेची आवश्यकता पटवून देणे, अस्वच्छतेच्या गंभीर परिणामांची जाणीव करुन देणे यासाठी ग्राम आरोग्य मार्गदर्शकांनी व आरोग्य केंद्रानी अभियान चालविणे आवश्यक आहे.

### पायाभूत सुविधांचा विकास :

### रस्ते व दळणवळण :

रस्ते व दळणवळणाच्या सुविधा यांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेमध्ये विकास प्रवाहित होत असतो. हे महत्व विचारात घेऊनच भारतामध्ये त्याचा विकासाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र ग्रामीण भागात त्यांची कमतरता जाणवते.

अनेक खेडयामधील अंतर्गत रस्तेही व्यवस्थित नाहीत. सर्व ऋतुमध्ये उपयोगी पडतील असे बाहय रस्ते नाहीत. कच्चे रस्ते वारंवार उखडतात व त्यामुळे गैरसोयीत भर पडते. शेतीचा हंगाम संपल्यानंतर रस्त्याचे काम सुरु केल्यास ही पायाभूत सुविधा तर उपलब्ध होईलच, शिवाय ग्रामीण बेकारीचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल.

### सिंचन सोयी :

वारसा हक्काचे कायदे व काही प्रमाणात सीलिंगचे कायदे यामुळे भारतात धारण क्षेत्राचा सरासरी आकार लहान होतो आहे. जवळपास ८० प्रतिशत कास्तकार आता अल्पभूधारक आणि सीमांत भूधारक या वर्गवारीत येतात. ही छोटी धारणक्षेत्रे बहुतांशी कोरडवाहू असल्यामुळे त्यावर शेती करणे परवडनासे झाले आहे. सिंचनाची व्यवस्था विकसित झाल्यास छोटया कोरडवाहू धारणक्षेत्रांचे आर्थिक गणित बदलू शकते. त्यासाठी लघूसिंचन प्रकल्प जास्त उपयोगी ठरतील. मोठया प्रकल्पांची उभारणी प्रचंड खर्चाची असते. त्यांच्या फलप्राप्ती काळही दीर्घ असतो, तसेच त्यामुळे विस्थापनाची समस्या निर्माण होते याउलट तलाव, नाले, विहिरी व छोटे प्रकल्प लवकर पूर्ण होतात. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाचे यशस्वी प्रयोग राळेगण सिध्दी, हिवरे बाजार वैगेरे ठिकाणी झाले आहेत. विशेष म्हणजे शेतीच्या हंगामानंतर ही कामे हाती घेतल्यास बेरोजगारांना काम मिळू शकते.

*विदयुतः*

सिंचनाचे शेतीसाठी असणारे महत्त्व यापुर्वी स्पष्ट केले आहे. पूर्वीच्या काळी विहिरीचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेले मोट हे साधन आता कालबाहय झालेले आहे. त्यासाठी खेडयामध्ये विद्युतची पायाभूत सुविधा असावयास हवी. १ एप्रिल २०१५ रोजी देशातील एकूण १८,५४२ गावामध्ये वीज नव्हती. पंतप्रधानांनी राष्ट्राला उददेशून केलेल्या त्यांच्या भाषणात १००० दिवसात देशातील सर्व खेडी विजेच्या लखलखाटाने उजळून निघतील असे स्पष्ट केले आहेत. पुढील काही वर्षात ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाच्या मदतीने हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

*तक्ता क्र. 1.1 मध्ये ग्रामीण विद्युतीकरणाची सद्यस्थिती दर्शविली आहे.*
*ग्रामीण विद्युतीकरणाची सद्यस्थिती 31/03/2011 पर्यंत*

| अ.नं | राज्य | लोकवस्ती असलेले खेडी | विद्युतीकरण झालेली खेडी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | २६२८६ | २६२८६ | १००.०० |
| २ | अरुणाचल प्रदेश | ५२५८ | ३६६४ | ७०.०३ |
| ३ | आसाम | २५३७२ | २४५६६ | ९६.०८ |
| ४ | बिहार | ३९०७३ | ३७३१६ | ९५.०५ |
| ५ | छत्तीसगड | १९५६७ | १९११६ | ९७.०७ |
| ६ | गोवा | ३२० | ३२० | १००.०० |
| ७ | गुजरात | १७८४३ | १७८४३ | १००.०० |
| ८ | हरीयाणा | ६६४२ | ६६४२ | १००.०० |
| ९ | हिमाचल प्रदेश | १७८८२ | १७८८१ | ९९.९९ |
| १० | जम्मू व काश्मिर | ६३३७ | ६२२४ | ९८.०२ |
| ११ | कर्नाटक | २७३९७ | २७३६३ | ९९.०९ |
| १२ | केरळ | १०१७ | १०१७ | १००.०० |
| १३ | मध्यप्रदेश | ५१९२९ | ५०४६४ | ९७.०२ |
| १४ | महाराष्ट्र | ४०९५६ | ४०९२० | ९९.०९ |
| १५ | झारखंड | २९४९२ | २७२१३ | ९२.०३ |
| १६ | मणिपूर | २३७९ | २०६१ | ८६.०६ |
| १७ | मेघालय | ६४५९ | ५१७५ | ८०.०१ |
| १८ | मिझोरम | ७०४ | ६४१ | ९१.०१ |
| १९ | नागालॅंड | १४०० | १२७१ | ९०.०८ |
| २० | ओडिशा | ४७६७७ | ४३७५८ | ९१.०८ |
| २१ | पंजाब | १२१६८ | १२१६८ | १००.०० |
| ०२२ | राजस्थान | ४३२६४ | ३९०९२ | ९०.०८ |
| २३ | सिक्किम | ४२५ | ४२५ | १००.०० |
| २४ | तामिळनाडू | १५०४९ | १५०४९ | १००.०० |
| २५ | त्रिपुरा | ८६३ | ८३७ | ९७.०० |
| २६ | उत्तरांचल | १५७४५ | १५६३८ | ९९.०३ |
| २७ | उत्तरप्रदेश | ९७८१३ | ९६५१५ | ९८.०७ |
| २८ | पश्चिम बंगाल | ३७४६३ | ३७४६१ | ९९.९९ |
|  |  | ५९६७८० | ५७६९५९ | ९६.०७ |

| अ. नं | केंद्रशासित प्रदेश | लोकवस्ती असलेले खेडी | विद्युतीकरण झालेली खेडी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | अंदमान व निकोबार | ३९६ | ३०८ | ७७.०८ |
| २ | चंदीगड | ५ | ५ | १००.०० |
| ३ | दादरा आणि नगर हवेली | ६५ | ६५ | १००.०० |
| ४ | दमण आणि दिव | १९ | १९ | १००.०० |
| ५ | दिल्ली | १०३ | १०३ | १००.०० |
| ६ | लक्षद्विप | ६ | ६ | १००.०० |
| ७ | पॉन्डेचरी | ९० | ९० | ८७.०१ |
| | | ५९७४६४ | ५७७५५५ | ९६.०७ |

Source : www.cea.nic.in

***भारतीय स्त्रीची आर्थिक कियाशिलता :*** भारतीय जनगणनेमध्ये आर्थिक दृष्टया उत्पादक म्हणजे ज्याला मोबदला मिळतो अशाच कामांचा विचार केला जातो. स्त्रीयांनी घरगुती क्षेत्रात केलेले मोठया प्रमाणातील श्रम राष्ट्रीय उत्पन्नामध्ये मोजले जात नाही. परिणामी भारतात स्त्रीयांचे श्रमातील सहभागाचे प्रमाण हे पुरुषापेक्षा कमीच आहे. सन १९७१ ते १९९१ हया काळात आर्थिक दृष्टया क्रियाशील स्त्रीयांचे प्रमाण १४.२४ वरुन २२.३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. ़स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा आर्थिक क्रियाालिता हा मोजता येण्यासारखा व म्हणून एक महत्वपूर्ण निर्देशांक आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार स्त्री कामागारांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

***भारतीय स्त्री श्रमिकांचे वर्गीकरण तक्ता क्र. 1.2***

| अ.नं | कामांचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक व तांत्रिक | ३.९ : |
| २ | विक्रीशी संबधीत | १.७ : |
| ३ | कारकूनी व संबधित व्यवसाय | १.४ : |
| ४ | शेती, मासेमारी, वनौपज क्षेत्राशी संबधीत काम | ८१.३ : |

सन २००९-१० आकडेवारीनुसार स्त्री कामगार २६.०१ : असून शहरी भागातील प्रमाण १३.८ : व पुरुषांइतकेच वेतन घेणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण आज ६२ : पर्यंत गेले आहे. एकुण स्त्री कामागारापैकी बहुतांशी स्त्रीया आज असंघटीत क्षेत्रात काम करताना दिसून येतात. राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते दलित स्त्रीयांपैकी ८५ : स्त्रिया शेतमंजूर, साफसफाई, झाडलोट इत्यादी सारखी काम करतात. इतर स्त्रिया विणकाम, कातडी, कमावणे, कापड उद्योगातील काम, दगडकाम, बांधकाम, शिंम्पी काम इ. असंघटीत श्रमिक आणि लघुउद्योगात काम करतात. बाकी उरलेल्या १५ : दलित स्त्रियाबाबत एकतर त्या बेरोजगार असतात किंवा त्यांच्या हलक्या दर्जाच्या कामाची दखल घेतली जात नाही. हयाबरोबरच एका बाजूने बघितले तर आजची महिला सर्वच क्षेत्रात अघाडीवर असून पुरुषांच्या बरोबरीने आपली कर्तबगारी दाखवित आहे. महिलांच्या उत्कर्षा शिवाय एकुणच प्रग्रती होणे कठिण असल्याचे ओळखल्याने १९९४ साली महिला सक्षमीकरण व सबलीकरण धोरण आखणारे देशतील महाराष्ट्र राज्य पहिले ठरले आहे.

***कृषी सप्तक कार्यक्रम :***

श्येत्या पंचवीस वर्षामध्ये महाराष्ट्रातील शेती विकासातील जी आव्हाणे आहेत त्यांचे अध्ययन करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. डॉ. एम.एस. स्वामीनाथन अध्यक्ष असलेल्या या समितीने तिला अहवाल डिसेंबर २००२ मध्ये सादर केला समितीच्या निरनिराळया शिफारशीपैकी सात शिफारशीवर कारवाई करणार 'कृषी सप्तक' हा कार्यक्रम २००३-२००४ पासुन अमलात आणण्याचे निश्चित झाले होते.

१) पिक विमा योजना सर्व कोरडवाहु शेतकऱ्यासाठी टप्या टप्याने वाढविणे.

२)कोरडवाहु शेतकऱ्याच्या उत्पान्नात भरीव वाढ होण्याकरीता सेंद्रीय शेती, एकात्मिक कीड व्यवस्थापन, गांडूळ खताचा वापर, जैविक खते व जैविक औषधाचे उत्पादन इत्यादी योजना मोठयाप्रमाणात राबविणे तसेच सर्व शेतकऱ्यांना मृद परिक्षन पत्रिका देणे.
३)शेतकऱ्यांना कृषी व बाजारविषय मार्गदर्शन उपब्लध करुन देण्यास महाराष्ट्र कृषी व फलोत्पादन माहिती व तंत्रज्ञअभियान (माहिती) हाती घेणे आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी हर्च्युअल विद्यापीठाची स्थापना करणे.
४)कृषी मालाच्या गुणवत्ता चाचणीसाठी विविध प्रयोगशाळेची निर्मिती करणे व पणन माहिती केंद्राचे जाळे उभारणे.
५)कृषी क्षेत्रात महिलांचा अधिक कार्यक्षम सहभाग वाढविणे.
६)शेती व सलग्न क्षेत्रात स्वंयरोजगार निर्मितीस मोठया प्रमाणात प्रोत्साहन देणे.
७)कृषी मंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील कृषी व संलग्न विषयांशी निगडीत प्रगतीशील शेतकरी, तज्ञ, शास्त्रज्ञ इ. चा समावेश असणारी कृषी परिषद स्थापन करणे.

ग्रामीण विकासासाठी भारताने विविध योजनांच्या आधारे विकास करण्याचे कार्य हाती घेतले. केंद्र शासन पुरस्कृत योजना-महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महालक्ष्मी सरस, सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, राष्ट्रीय जीवननोत्ती अभियान, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, इंदीरा आवास योजना, बायोगॅस, पंचायतीराज बळकटीरण व उत्तरदायीत्व प्रोत्साहन योजना, पंचायत महिला शक्ती अभियान, मागास क्षेत्र अनुदान निधी, तेराव्या वित्त आयोगाचा निधी, राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना.

**मागील 65 वर्षातील स्वतंत्र भारताच्या विकासाचे चित्र**
**तक्ता क्. 1.3**

| अ. क्र. | विविध घटक | १९५०-५१मधील स्थिती | २०१०-२०११ मधील स्थिती |
|---|---|---|---|
| १ | लोकसंख्या | ३६ कोटी ११ लक्ष | १२१कोटी २ लक्ष |
| २ | साक्षरता दर | १८.३३: | ७४.०४: |
| ३ | राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राला वाटा | ५५.०४: | १६.०१ |
| ४ | राष्ट्रीय उत्पन्नातील उद्योग क्षेत्राचा वाटा | ६.००: | २६.००: |
| ५ | राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा | २७.०५: | ५७.००: |
| ६ | भारताचा विदेशी व्यापार | १२१४ कोटी रुपये | २२,२१,२७७ कोटी रु. |
| ७ | विद्युत निर्मिती क्षमता | ५६० मॅगावॅट | १,४०,००० मॅगावॅट |
| ८ | रस्ते मार्गाची लांबी | ४०० हजार कि.मी. | २४८३ हजार कि. मी. |
| ९ | रेल्वे मार्गाची लांबी | ५३६००कि.मी. | ६४४६०कि.मी. |
| १० | उपलब्ध सिचंन क्षमता | २२.०६ दशलक्ष हेक्टर | १३९.८९ दशलक्ष हेक्टर |
| ११ | अन्नधान्य उत्पादन | ५०.८२ दशलक्ष टन | २१२दशलक्ष टन |
| १२ | दरडोई खादयान्न उपलब्धता | ३९४.०२ग्रॅम | ४६३.०२ ग्रॅम |
| १३ | दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या | ८०:(सुमारे) | २२: |
| १४ | सरासरी दरहजारी जन्मदर | ३९.०९: | २३.०५:(२००६) |
| १५ | सरासरी दरहजारी मृत्युदर | २७.०४: | ०.७.०५:(२००६) |

(वरील कोष्टकावरुन भारतातील मागील ६५ वर्षातील विविध घटकासंबंधी विकासाचे चित्र स्पष्ट होते.)

***सारांश :***

२०११ च्या जनगणनेनुसार ६८.८४ टक्के लोकसंख्या खेडयात राहत असल्याने शेतसाठी सिंचन सुविधा व

ग्रामविकासाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. खेडयांचा विकास झाला तरच भारत २०२२ पर्यंत महासत्ता होण्याचे स्वप्न साकार होईल.

*संदर्भसूची :*


१. गंगाधर कराळे, विजय कविमंडन (२००६), ''ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन'', मंगेश प्रकाशन, नागपूर.
२. ''योजना'' (विकास समर्पित मासिक), ऑगस्ट २०१२ अंक-१, पृष्ठ क्रं.२४,२८
३. ''योजना'' (विकास समर्पित मासिक), फेब्रुवारी २०१४ अंक-१, पृष्ठ क्रं.४१
४. ''योजना'' (विकास समर्पित मासिक), मार्च २०१६ अंक-५, पृष्ठ क्रं.२६
५. www.cea.nic.in
६. www.censesofindi.com





*बाळासाहेब जयराम जाधव*
*संशोधन केंद्र, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग , स.म.भा.स. थोरात महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org